कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र.2815/शि.वि./2016
दि. 6/09/2016

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथमिक/उच्च प्राथ./माध्य. शाळा
म.न.पा. नागपूर

विषय :– आपल्या शाळेमध्ये खालील उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ :1)डॉ.प्रदीप दासरवार, आरोग्य अधिकारी, म.न.पा., नागपूर यांचे दि.03.09.2016 चे पत्र.
2)मा.सभापती शिक्षण समिती मनपा, नागपूर यांचे दि.12.08.2016 च्या पत्रान्वये.
3)वैद्यकीय अधिकारी, साथरोग व लसीकरण कार्यक्रम,म.न.पा., नागपूर यांचे दि.26.07.2016 चे पत्र.
4) मा.अपर आयुक्त, म.न.पा., नागपूर यांचे दि.02.09.2016 चे परिपत्रक.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सुचित करण्यात येते की, आपल्या शाळेमध्ये शासकीय उपक्रम राबवावयाचे असून त्याची अमंलबजावणी पुढीलप्रमाणे करावी.

1)स्वच्छ भारत अभियान :– स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्रत्येक पंधरवाडयात एक संकल्पना निवडून त्याप्रमाणे अमंलबजावणी करण्याबाबत संदर्भिय पत्राव्दारे कळविले आहे. दि. 01 संप्टेंबर ते 15 संप्टेंबर 2016 दरम्यान शिक्षक दिनाचे औचित्य साधून शाळेत विद्यार्थी व शिक्षक मिळून स्वच्छता समिती निर्माण करावयाची आहे. या समितीमार्फत शाळेत श्रमदान राबविण्यात यावे. शालेय परिपाठात स्वच्छतेची शपथ घ्यावयाची आहे. www.swachhbharat.mygov.in या संकेतस्थळावर केलेल्या श्रमदानाचे फोटो अपलोड करावे.

2) शाळा स्वच्छता अभियान –
महानगरपालिका अधिनस्त शाळांमध्ये शाळा स्वच्छता अभियान अंतर्गत आठवडयातून एकदा स्वच्छता अभियान राबवावयाचे आहे आपल्या शाळेत स्वच्छता अभियान राबवून यामध्ये विद्यार्थ्यांचे सहकार्य घ्यावे. यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी स्वावलंबन बाणवता येईल व श्रमप्रतिष्ठेविषयी आदर निर्माण करता येईल.

3) पिण्याचे पाण्याचे प्रयोगशाळातून तपासणी अहवाल –
महानगरपालिका अधिनस्त शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची कोणती व्यवस्था आहे ती व्यवस्था योग्य आहे अथवा नाही ? याकरीता विद्यार्थ्यांना पिण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या पाण्याची वर्षातून दोनदा प्रयोगशाळेमार्फत तपासणी करून घ्यायची आहे याकरीता आपल्या झोनच्या साथरोग व लसीकरण कार्यक्रम विभाग (आरोग्य विभाग) यांचेशी संपर्क साधावा. जेणेकरून विद्यार्थ्यांना जलजन्य आजारांपासून दूर ठेवता येईल.

4) नागरिक/पालकांशी सन्मानाची व सौजन्याची वागणूक ठेवण्याबाबत :– आपल्या शाळेत नागरिक/पालक/पदाधिकारी तसेच विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते तक्रारी संबंधात आपल्या शाळेला भेट देतात. त्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. नागपूर महानगरपालिकेचे स्थायी आदेशान्वये अधिकारी/कर्मचारी सेवाशर्थी नियमान्वये आपले कर्तव्यात कोणत्याही प्रकारची गैरवर्तणूक व असभ्य वागणूक नागपूर महानगरपालिकेचे 11(अ) चे उल्लंघन करणारे ठरत असून महाराष्ट्रनागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 चे कलम 3 नुसार शिस्तभंगाचे कार्यवाहीस पात्र ठरतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

वरील उपक्रमांबाबत त्वरीत कार्यवाही करून आपल्या झोनच्या शाळा निरीक्षक यांना त्वरीत अहवाल सादर करावा.

(फारूक अहमद खान)
शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :–
1) मा.उपायुक्त–1, म.न.पा.नागपूर यांना माहितीस्तव सादर.

pc:2/reshma/tembhurne /letter T